सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजनेसाठी आर्थिक वर्ष सन २०१९-२०च्या अर्थसंकल्पातील (२२३५-०११३) या लेखाशीर्षाखाली दि. १ एप्रिल, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत खर्चासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. अपअ-२०१९/प्र.क्र.२३/ का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- **२८ ऑगस्ट, २०१९**

<u>वाचा</u>- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अपअ-२०१९/प्रक्र २३/का-९ दि. १३/०५/२०१९.
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९

प्रस्तावना

१. "महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१९" (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) यास विधान मंडळाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०१९ चा **महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०८, महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४**, दि. ४ जुलै, २०१९ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भांधीन परीपत्रकान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पहील्या नऊमाही साठी (माहे डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत) अर्थसंकल्पीत केलेल्या तरतुदीच्या ६० % च्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३. सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजनेकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी क्रमांक एक्स १, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६- सुधार सेवा, (००), (०१). (०१), सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजने (२२३५-०११३) ३१- सहाय्यक अनुदाने, (वेतनेतर), या लेखाशीर्षाखाली एकूण रु. १,००,००,०००/- (रु. एक कोटी, फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ३३,००,०००/- (रु. तेहत्तीस लाख फक्त) इतका निधी संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे.

४. या लेखाशीर्षाखाली वेतनेतर देयके अदा करण्यासाठी दि. ३१ डिसेंबर,२०१९ पर्यंत खर्च भागविण्यासाठी उपरोक्त ६०% मर्यादेप्रमाणे उर्वरित निधी रु. २७,००,०००/- (रु. सत्तावीस लाख फक्त) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजनेकरिता मागणी क्रमांक एक्स १, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६- सुधार सेवा, (००), (०१). (०१), सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजने (२२३५-०११३) ३१- सहाय्यक अनुदाने, (वेतनेतर), या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीपैकी दि. ३१ डिसेंबर,२०१९ पर्यंत खर्च भागविण्यासाठी रु. २७,००,०००/- (रु. सत्तावीस लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील निधी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि. ८ जुलै,२०१९ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन खर्च करण्यात यावा. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल तसेच दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीसाठी वितरीत करण्यात आलेल्या लेखानुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास त्वरीत सादर करण्यात येईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या दि. ८ जुलै,२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून महिला व बाल विकास विभागास दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२८११४७५४२२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHADIJA FAROOQUE NAIKWADE

Digitally signed by KHADIJA FAROOQUE NAIKWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=8cd35f5dfe17a9e9a0cd531b6bb11d782183e791bc817e7a736def213ac7d71b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBA, ou=WOMEN AND CHILD DEVLOPMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KHADIJA FAROOQUE NAIKWADE
Date: 2019.08.28 11:58:39 +05'30'

(खदीजा नाईकवाडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
२.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
७. कक्ष अधिकारी (व्यय-६ / अर्थसंकल्प-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना विनंती करण्यात येते की, सदर निधी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तात्काळ वितरीत करण्यात यावा.
९. निवड नस्ती (का-९)